(असाधारण)

अधिसूचना

क्रमांक : २२९/२०२५. दिनांक : २९/११/२०२५

विषय : अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासंदर्भात समायोजनाबाबत.

सर्व संबंधितांचे माहितीकरीता अधिसूचित करण्यात येते की, विज्ञान व तंत्रज्ञान या विद्याशाखेतर्गत अभियांत्रिकी व तांत्रिकी गटामधील NEP 2020 या परीक्षा पद्धतीत CGS परीक्षा पद्धतीतील विद्यार्थ्यांना सत्र- ३ व पुढे प्रवेश देतेवेळी, CGS परीक्षा पद्धतीतील सर्व विषय उत्तीर्ण करावे लागतील व NEP 2020 पद्धतीतील प्रथम व द्वितीय सत्रातील IKS व PCC हे विषय महाविद्यालय स्तरावर परीक्षा देऊन सत्र पाचला प्रवेश घेण्या अगोदर उत्तीर्ण करावे लागतील. CGPA ची गणना अंतिम सत्राला करतेवेळी प्रथम व द्वितीय सत्रासाठी 44 श्रेयांक गृहीत धरून गणना करण्यात येईल.

प्रथम वर्ष सीबीसीएस उत्तीर्ण किंवा अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना द्वितीय वर्षात प्रवेश देतेवेळी IKS व PCC हे विषय व श्रेयांकाची गणना उपरोक्त प्रमाणे करण्यात येईल.

अभियांत्रिकी पदविका उत्तीर्ण विद्यार्थ्यांना थेट द्वितीय वर्षात प्रवेशित देते वेळी उपरोक्त परिच्छेदाप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

महाविद्यालय स्तरावर परीक्षा घेतेवेळी परीक्षा आवेदन पत्रे प्रचलित पद्धतीने भरण्यात यावी.

सदर बाब शैक्षणिक वर्ष 2025- 2026 पासून लागू करण्यात येत आहे. व या अगोदर निर्गमित अधिसूचना 208/ 2025 अधिक्रमित करण्यात येत आहे.

स्वा/-
(डॉ. नितीन कोळी)
प्रभारी कुलसचिव,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.
अमरावती.

****